Book Code : EDU 422
Subject Code : EDU 422




# समकालीन भारतीय समाज आणि शिक्षण

**EDU 422**

अधिष्ठान अभ्यासक्रम

ज्ञानगंगा घरोघरी
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
ज्ञानगंगा घरोघरी मुक्त विद्यापीठ

**EDU422**
बी.एड.

# समकालीन भारतीय समाज आणि शिक्षण


| | |
|---|---|
| घटक १ : समकालीन भारतीय शिक्षण | १ |
| घटक २ : भारतीय संविधानातील तरतुदी व शिक्षण | ४५ |
| घटक ३ : शिक्षणविषयक धोरणे, कायदे आणि तरतुदी | ६१ |
| घटक ४ : भारत सरकारच्या शिक्षणविषयक योजना | १०३ |
| घटक ५ : भारतीय व पाश्चात्य शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षण | १२७ |
| घटक ६ : नयी तालीम | २०१ |

## लेखक समिती


**डॉ. कविता साळुंके**
प्र. संचालक, नाशिक

**डॉ. मीना कुटे**
प्राचार्य, मुंबई

**डॉ. नीलिमा मोरे**
अकोला

**डॉ. बी. एस. वाळके**
माजी संचालक, नाशिक

**डॉ. भूषण कर्डिले**
प्राचार्य, नाशिक

**प्रा. विजयकुमार पाईकराव**
नाशिक

**श्रीमती कल्पना साळुंके**
नाशिक

**डॉ. गणेश चव्हाण**
मुंबई

**डॉ. राकेश रामराजे**
मुंबई

**डॉ. संजीवनी महाले**
नाशिक

**श्री. सचिन अशोक घोरे**
नाशिक

**प्रा. आर. आर. गायकवाड**
परभणी

**डॉ. महेश कोलतमे**
मुंबई

**डॉ. मंगेश ढोबळे**
जालना

**डॉ. एस. एस. सोनुने**
नाशिक

**डॉ. विजया पाटील**
नाशिक

**डॉ. पुष्पा पाटील**
नवापूर

**डॉ. डी. डी. पवार**
नाशिक

**श्रीमती ज्योती लष्करी**
नाशिक

**श्रीमती मनीषा पाटील**
नाशिक

**डॉ. के. व्ही. देवरे**
मुंबई

**डॉ. उज्वला सदाफळ**
वर्धा


## संपादन समिती (आशय, भाषा व अनुदेशन)


**डॉ. अनंत जोशी**
माजी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

**डॉ. कविता साळुंके**
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक


## निर्मिती


श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

*First Edition developed under DEC development grant.*



© २०१८, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



❑ **प्रथम मुद्रण** : मार्च २०१६ ❑ **प्रकाशन क्रमांक** : २२९२ ❑ **पुर्नमुद्रन** : डिसेंबर २०२०
❑ **मुखपृष्ठ रेखाटन** : अविनाश उमकांत भरणे
❑ **अक्षरजुळणी** : परफेक्ट कॉम्प्युटर, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक - ८
❑ **मुद्रक** : मे. नीट प्रिंटस, प्लॉट नं. डब्ल्यू-३६/सी-१, एम.आय.डी.सी., अहमदनगर - ४१४ १११.
❑ **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**B18-19-69**

# घटक ५ : भारतीय व पाश्चात्त्य शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षण

*अनुक्रमणिका*

५.० उद्दिष्टे
५.१ प्रास्ताविक
५.२ विषय-विवेचन
५.२.१ भारतीय शिक्षणतज्ज्ञांचे योगदान रवींद्रनाथ टागोर, म. गांधी, जोतिबा फुले, सॅम पित्रोदा, ए.पी.जे. अब्दुल कलाम
५.२.२ पाश्चात्त्य शिक्षणतज्ज्ञांचे शिक्षणातील योगदान प्लेटो, रुसो, जॉन ड्युई, पाऊलो, फ्रिअरो, इव्हान इलिच
५.२.३ विविध शैक्षणिक संप्रदायांचे शैक्षणिक योगदान. निसर्गावार, आदर्शवाद, वास्तववाद आणि कार्यवाद
५.२.४ शिक्षणातील नवे प्रवाह परिचय : ज्ञानरचनावाद, बुद्धिमंथन, समस्या निराकरण, संकल्पनाचित्रण, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, दूरशिक्षण, प्रकल्प व अध्यापन प्रतिमाने
५.३ सारांश
५.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
५.५ क्षेत्रीय कार्य
५.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ५.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही,

* भारतीय व पाश्चात्त्य शिक्षणतज्ज्ञांचे शिक्षणातील योगदान सांगू शकाल.
* तत्त्वज्ञानातील विविध संप्रदायाचे शिक्षणातील महत्त्व स्पष्ट करू शकाल.
* विविध संप्रदायांतील तत्त्वांचा मानवी जीवनाशी संबंध विचारात घेऊन त्यांचा दैनंदिन जीवनात वापर करू शकाल.
* शिक्षणातील नवनवीन प्रवाहांची माहिती, उपयुक्तता, कारणमीमांसासह स्पष्ट करू शकाल.

## ५.१ प्रास्ताविक

भारतीय शिक्षणात भारतीय शिक्षणतज्ज्ञांच्या सोबतच पाश्चिमात्य शिक्षणतज्ज्ञांचे योगदान आहे. त्यातील काही शिक्षणतज्ज्ञांचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत. गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर ज्यांनी विद्यार्थी केंद्रित शिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे. निसर्गसान्निध्यात शिकणाऱ्याच्या मनावरील दडपण कमी होऊन व्यक्तिमत्त्व विकास होतो हे त्यांचे महत्त्वाचे तत्त्व. विश्वाची व्यापक कल्पना त्यांनी मांडली. म. गांधी ज्यांनी मूलोद्योगी शिक्षणाचा पुरस्कार केला, श्रमप्रतिष्ठा स्थापन केली. म. फुले ज्यांना स्त्रीशिक्षणाचे दाते म्हणता येईल. तर सॅम पित्रोदा यांनी राष्ट्रीय ज्ञान आयोग मांडला आणि माननीय माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम ज्यांनी